आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता

१० मार्च २०२४ - रविवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- देशाच्या विकासाकरता चाललेल्या कामांची संभावना विरोधकांनी निवडणुकीतली आमिषं म्हणून करु नये असं प्रधानमंत्र्यांचं प्रतिपादन
- पुणे आणि कोल्हापूर सह देशातल्या १५ विमानतळांवरच्या टर्मिनलचं प्रधानमंत्र्यांच्या हस्ते लोकार्पण आणि भूमीपूजन
- रणजी करंडक क्रिकेट स्पर्धेचा अंतिम सामना मुंबईत वानखेडे मैदानावर सुरु

**आणि**

- मिस वर्ल्डचा किताब चेक गणराज्याची क्रिस्टिना प्रीझकोव्हानं जिंकला

**<><><><><>**

देशात विकासकामांनी वेग घेतला असून हा खटाटोप २०४७ पर्यंत भारताला जगात प्रथम क्रमांकावर नेण्यासाठी आपण करत आहोत असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. विरोधकांनी या कामांकडे निवडणुकीतली आमिषं म्हणून पाहू नये, असं ते म्हणाले. उत्तरप्रदेशात आजमगढ इथं आज जाहीर सभेत ते बोलत होते......

**होल्ड- बाईट- प्रधानमंत्री**

देशभरातल्या विविध पायाभूत विकास प्रकल्पांचं उद्घाटन आणि भूमीपूजन आज प्रधानमंत्र्यांच्या हस्ते झालं. देशात नागरीकरण झपाट्यानं होत असून त्यामुळे सामान्यांचं जगणं सुखकर होत आहे असं ते म्हणाले. पुणे आणि कोल्हापूर सह देशातल्या १२ विमानतळांमधल्या नवीन टर्मिनलचं उद्घाटन तसंच हुबळी आणि कडप्पा सह ३ विमानतळांवरच्या नवीन टर्मिनलची पायाभरणी मोदी यांनी दूरस्थ पद्धतीने केली. कोल्हापूर इथं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, पुण्याहून उपमुख्यमंत्री

अजित पवार तसंच उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस या कार्यक्रमात सहभागी झाले होते. देशातली सात राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशात मिळून ९ हजार आठशे कोटींहून अधिक खर्चाचे 15 विमानतळ प्रकल्प उभारण्यात आले आहेत. याखेरीज देशातल्या अनेक महामार्गांच्या अद्ययावतीकरण प्रकल्पांचं लोकार्पण आणि भूमीपूजनही प्रधानमंत्री मोदी यांच्या हस्ते झालं.

<><><><><>

औद्योगिक सुरक्षा दलाचा-सीआयएसएफचा स्थापना दिन आज साजरा होत आहे. त्यानिमित्त केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी सीआयएसएफच्या जवानांना आणि त्यांच्या कुटुंबीयांना स्थापना दिवसाच्या शुभेच्छा दिल्या. सीआयएसएफ एक शक्ती म्हणून साहस आणि देशभक्तीचं प्रतीक असून ती देशातल्या महत्त्वपूर्ण पायाभूत सुविधांचं संरक्षण करते, असं सांगत केंद्रीय गृहमंत्री शहा यांनी देशाच्या सुरक्षिततेसाठी प्राणांची आहुती देणाऱ्या शहिदांना अभिवादन केलं आहे.

<><><><><>

भारत आणि युरोपियन मुक्त व्यापार असोसिएशननं आज व्यापार आणि आर्थिक भागीदारी करारावर स्वाक्षरी केली आहे. वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल यांच्या उपस्थितीत या करारावर नवी दिल्लीत स्वाक्षरी करण्यात आली.

या कराराअंतर्गत युरोपियन मुक्त व्यापार असोसिएशनमधली राष्ट्रं भारतात १०० अब्ज डॉलर्सची गुंतवणूक करतील. यामुळे विविध क्षेत्रात रोजगाराच्या अनेक संधी निर्माण होतील, असं मेळाव्याला संबोधित करताना गोयल यांनी सांगितलं. या करारात आइसलँड, लिकटेंस्टीन, नॉर्वे आणि स्वित्झर्लंड या देशांचा समावेश आहे.

<><><><><>

निवडणूक आयुक्त अरूण गोयल यांनी आयुक्त पदाचा राजीनामा दिला आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी गोयल यांचा राजीनामा स्विकारला आहे. गोयल यांच्या राजीनाम्यामुळं निवडणूक आयोगामध्ये आयुक्तांची दोन पदं रिक्त झाली आहेत. गोयल यांनी नोव्हेंबर २०२२ मध्ये निवडणूक आयुक्त म्हणून पदभार स्विकारला होता.

**<><><><><>**

संयुक्त राष्ट्र संघाच्या सुरक्षा परिषदेत तातडीने सुधारणा करणे आवश्यक असल्याचं भारताच्या संयुक्त राष्ट्र संघाच्या स्थायी प्रतिनिधी रुचिरा कंभोज यांनी म्हटलं आहे. त्या काल सुरक्षा परिषदेच्या ७८ व्या बैठकीत बोलत होत्या. २००० साली सुरक्षा समितीमध्ये आमुलाग्र सुधारणा करण्यावर एकमत झालं असलं तरी त्यावर जवळजवळ पंचवीस वर्ष केवळ चर्चाच सुरु असल्याबद्दल त्यांनी नाराजी व्यक्त केली. सुरक्षा परिषदेच्या सुधारणांमध्ये व्हिटो पॉवरचा अडथळा असू नये त्याचप्रमाणे सकारात्मक चर्चेसाठी नकाराधिकाराचा मुद्दा लवचिक असायला हवा. या संदर्भात जोपर्यंत ठोस निर्णय होत नाही तो पर्यंत सुरक्षा परिषदेच्या नव्या सदस्यांना नकाराधिकार अधिकार मिळू नये असंही त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

रणजी करंडक क्रिकेट स्पर्धेचा अंतिम सामना आजपासून मुंबईच्या वानखेडे स्टेडियम सुरु झाला. अंतिम सामन्या ४१ वेळा विजेतेपद पटकावलेल्या मुंबई संघाचा सामना दोन वेळच्या विजेत्या विदर्भ संघाबरोबर होत आहे. सामन्याच्या पहिल्या दिवशी आज विदर्भानं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला.

शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा मुंबईच्या ६ बाद १२१ धावा झाल्या आहेत.

<><><><><>

आंतरराष्ट्रीय चित्रपट क्षेत्रात प्रतिष्ठेचा असलेल्या ऑस्कर पुरस्कार सोहळ्यात निशा पाहुजा यांचा टू किल अ टायगर हा माहितीपट डॉक्युमेंटरी फिचर फिल्म श्रेणीत स्पर्धेत आहे. मूळ भारतीय वंशाची कॅनडाची नागरिक निशा पाहुजा यांच्या या माहितीपटावर  भारतीय चित्रपट रसिकांच्या नजरा केंद्रित झाल्या आहेत.

प्रतिष्ठेचा ऑस्कर पुरस्कार सोहळा उद्या लॉस एजलिंस इथं रंगणार आहे. भारतीय प्रमाण वेळेनुसार उद्या पहाटे ४ वाजता हा सोहळा सुरु होणार असून सुप्रसिद्ध अभिनेता जिम किमेल या पुरस्कार सोहळ्याचं सूत्रसंचालन करणार आहे.

दिग्दर्शक क्रिस्टोफर नोलन यांच्या “ओपेनहायमर” या चित्रपटाला यंदा सर्वाधिक १३ नामांकन मिळाली आहेत. योर्गोस लैथिमोस यांच्या “पुअर थिंग्ज” या चित्रपटाला ११ नामांकन मिळाली असून मार्टिन स्कोर्सिस यांच्या “किलर ऑफ फ्लॉवर” चित्रपटाला १० श्रेणींमध्ये नामांकने मिळाली आहेत.

<><><><><>

चेक रिपब्लिकच्या क्रिस्टिना प्रीझकोव्हानं मुंबई इथं काल झालेल्या मिस वर्ल्ड २०२४ च्या भव्य कार्यक्रमात ७१ वा मिस वर्ल्ड चा किताब जिंकला. या सौंदर्य स्पर्धेत ११५ देशांतल्या स्पर्धकांनी भाग घेतला होता. मागच्या वर्षीची मिस वर्ल्ड पोलंडची कॅरोलिना बिलावस्का हिनं क्रिस्टिनाला मुकुट परिधान केला. लेबना ॅनची यास्मिन जायतौन या स्पर्धेत उपविजेती ठरली.

क्रिस्टिना कायद्याची विद्यार्थिनी असून ती सामाजिक कार्यकर्ती आणि आंतरराष्ट्रीय मॉडेलही आहे.

<><><><><>

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणानं छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या टर्मिनल-२ च्या बाजूने उभारलेला उड्डाणपूल आज वाहतुकीसाठी खुला करण्यात आला. या वेळी केंद्रीय सामाजिक न्याय रामदास आठवले, कौशल्य, रोजगार, उद्योजकता, नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा, एमएमआरडीएचे आयुक्त डॉ. संजय मुखर्जी यांची विशेष उपस्थिती होती. या उड्डाणपुलामुळे टर्मिनल-२ आणि टर्मिनल-१ कडून वांद्र्याच्या दिशेने जाणाऱ्या गाड्यांना मोठा दिलासा मिळणार आहे.

**<><><><><>**

तृणमूल काँग्रेसचा निलंबित नेता आणि संदेशखळी प्रकरणात आरोपी असलेल्या शेख शाहजहानला आज कलकत्ता इथल्या बशीरहाट न्यायालयासमोर हजर करण्यात आलं. शेख शाहजहानबाबत उच्च न्यायालयानं या प्रकरणाचा  तपास आज संध्याकाळपर्यन्त सीबीआयकडे सोपवावा असं  निरीक्षण पूर्वीच नोंदवलं होतं. पश्चिम बंगाल पोलिसांनी शेख शाहजहानला २९  फेब्रुवारी रोजी अटक केली, त्यावेळी  त्याला न्यायालयानं त्याला १०  दिवसांची पोलीस कोठडी सुनावली होती,  त्याच्या कोठडीबाबत न्यायालय आज पुढील आदेश देणार आहे. ईडीच्या पथकावर हल्ला करण्याव्यतिरिक्त, शाहजहानवर जमीन बळकावणे, खंडणी वसूल करणे आणि त्याच्या साथीदारांसह महिलांवर अत्याचार केल्याचाही आरोप आहे.